I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** धनतोली **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0115 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/05/2026 07:02 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 21/05/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 22/05/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 15:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 02:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 21/05/2026 **Time (वेळ):** 20:42 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 014 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2026 05:45 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अधिक्षक अभियंता यांत्रीकी मंडळ, जलसंपदा विभाग अजनी , वैनगंगा नगर नागपुर शहर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सर तर्फे DYSP अनिल जिठ्ठावार

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर शहर, धनतोली, नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर शहर, धनतोली, नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9823270581

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रविंद्र निळकंठ वानखडे अधिक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ जलसंपदा विभाग नागपूर | | | 1. प्लाट नं 19 जनता सोसायटी,Town/Village (शहर / गाव): दिनदयाल नगर नागपूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): राणाप्रताप नगर,District (जिल्हा): नागपुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत<br>2. सावरखेड ता मोर्षी जि अमरावती,Town/Village (शहर / गाव): जि अमरावती,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मोर्शी,District (जिल्हा): अमरावती ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक आयफोन | 50,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | जप्त लाच रक्कमआलोसे यांचे ताब्यातुन 15000/ रुपये | 15,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | घटनास्थळावरुन एकुण 36,630/ रुपये. | 36,630.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | मेमोरी कार्ड sandisk 32 gb micro SD HCsr.no.52010NAZN130BM | .00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,01,630.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

पो.ठाणे धंतोली, नागपूर शहर

दिनांक 22/05/2026

माझे नाव अनिल मोहनरेड्डी जिट्टावार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, मोनं 9823270581

समक्ष पोलीस ठाणे धंतोली, नागपूर शहर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी मागील दिड वर्शापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर येथे कार्यरत आहे.
मी दि. 19/05/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रषासकिय ईमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे हजर असतांना श्री. राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक यांनी आम्हाला बोलाविले. त्यावरून आम्ही पोलीस अधीक्षक कार्यालय, ला.प्र.वि. नागपूर येथे येवून वाचक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार यांना भेटलो असता त्यांचे कक्षात एक व्यक्ती बसुन होते. श्री. राजीव कर्मलवार यांनी त्यंाचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तीचा परिचय आम्हास श्री आषिश प्रेमलाल डोंगरे, वय 44 वर्ष, असा करून दिला. श्री. राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक यांनी आम्हास सांगितले की, श्री आषिश प्रेमलाल डोंगरे यांची एका लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे. त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेषीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेषित केले आहे. श्री आषिश प्रेमलाल डोंगरे यांना आम्ही आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक

विभाग, प्रषासकिय ईमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे सोबत घेवून आलोत. तक्रारदार श्री आषिश प्रेमलाल डोंगरे, वय 44 वर्ष, व्यवसाय- कंत्राटदार रा. प्लॉट क्र. 50, श्रीकृश्णनगर, वाठोडा, नागपूर हे वेळ अंदाजे 11.30 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रषासकिय ईमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर कार्यालयात हजर आले व त्यांनी आम्हास एका लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली व ती आम्ही टंकलिखीत करुन घेतली सदर हस्तलिखीत व टंकलिखीत तक्रारीवर त्यांनी व आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाचरक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही मा. सहआयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर तथा महाव्यवस्थापक, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना पत्र देऊन वर्ग-2/3 चे दोन शासकीय अधीकारी/कर्मचारी पंच म्हणून काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र पोषी. प्रफुल भातुलकर यांचे हस्ते सादर केले. त्यानुसार त्यांचे कार्यालयातील वर्ग-3 चे श्री. अमित भिमराव बागेष्वर, वय 39 वर्ष, पद - कनिष्ठ लिपीक, कार्यालय सचिव-2 (संपत्ती) विभाग, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर, रा. हाऊस क्र. 56, रविमुर्ती कारखान्याचे मागे, इमामवाडा, नागपूर व श्री. पियुश गणेश मेश्राम, वय 37 वर्ष, पद - कनिष्ठ लिपीक, कार्यालय हॉटमिक्स प्लांट, वांजरा, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर रा. प्लॉट क्र. 402, इंदोरा चैक, मॉडल टाउन, कामठी रोड, नागपूर यांना आमचे कार्यालयात पोषी. प्रफुल भातुलकर यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून आमचे कार्यालयात वेळ 14.30 वा. पोशि. प्रफुल भातुलकर यांचे सह हजर आले. पोशि. प्रफुल भातुलकर यांनी त्यांची ओळख आम्हास करुन दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना आमची ओळख करून देवुन त्यांना सांगितले की, आमचेकडे लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणीसंबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकांविरुध्द सापळयाचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. अशा कारवाईत त्यांनी पंच म्हणून काम करण्याबाबत संमती घेतली असता त्यांनी संमती दिली. त्यानंतर आम्ही पंचाना तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे टंकलिखित केलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे,

माझे नावः- आशिष प्रेमलाल डोंगरे, वय 44 वर्ष, व्यवसाय- कंत्राटदार रा. प्लॉट क्र. 50, श्रीकृष्णनगर, वाठोडा, नागपूर  मोबाईल क्रमांक 9372353541.

मी समक्ष लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय प्रशासकिय ईमारत क्र. 1 येथील 4 था माळा नागपूर येथे हजर राहुन तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद ठिकाणी राहत असून जल संधारण विभागामध्ये मान्यताप्राप्त कंत्राटदार म्हणुन  मागील 16 वर्शापासून कॉपर डॅम बंधारे बनविण्याचे काम करतो व माझी शिला इंडस्ट्रीज या नावाने फर्म आहे.

कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग,  यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, नागपूर कार्यालयातर्फे मला 1)E-Tender Notice 17/2023/24 tender ID 2023-WRDMN-996015-1 Feabrication and dErection of Approch Bridge/Platfor dam top to jackwell and backing plate and supply and erction of air vent pipe of lakhamapur minor Irrigation project tah Hingna dist Nagpur under Executive Enginner Irrigation project Division Nagpur (1425745) या

कामाचे रु. 14,25,745/- चे कार्यादेश दि. 11/03/2024 रोजी प्राप्त झाले. तसेच कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, प्रमुख व्दार उभारणी पथक क्र. 2, नागपूर कार्यालयातर्फे 2Strengthi\ening of stem Hoist cap 15T-3 Nos Extension of platform and rail for Cross Travel of EOT Providing canopy and maintenance of EOT emergncy gate and Fitting of S S Plate to embedment of forbay gate of Karchkheda Project (Tender ID NO 023-WRDMN-1038562-1)द्वया कामाचे रु. 9,95,843/- चे कार्यादेश दि. 25/06/2024 रोजी प्राप्त झाले. वरीलपैकी क्र. 2 प्रकल्पाचे काम मार्च 2026 मध्ये पुर्ण झालेले असून क्र. 1 प्रकल्पाचे काम सुरु आहे. वरील दोन्ही कामांची एकुण रक्कम रु. 24,21,588/- लक्ष होते.

दि. 14/05/2026 रोजी मी अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, अजनी, नागपूर कार्यालयात काम पुर्ण झालेल्या प्रकल्पाच्या बिलाविशयी माहिती घेण्यास गेलो असता गैरअर्जदार श्री रविंद्र वानखेडे, अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, अजनी, नागपूर हे मला पायर्यांवर भेटले व त्यांनी मला त्यांच्या कक्षात बोलाविले. मी कक्षात गेलो असता गैरअर्जदार श्री रविंद्र वानखेडे, अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, अजनी, नागपूर यांनी मी केलेल्या कामांचे देयके पारीत करण्याकरिता रु. 24,21,588/- लक्ष या एकूण रकमेच्या 2 टक्के कमीशन रु. 50 हजार ची लाचेची मागणी केली.त्यावेळेस मी त्यांना ठिक आहे असे बोलून तिथून निघून गेलो.

तरी मला जलसंपदा विभाग, नागपूर येथील केलेल्या कामाचे देयके पारीत करण्याकरिता गैरअर्जदार श्री रविंद्र वानखेडे, अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, अजनी, नागपूर यांनी रु. 50,000/- लाचेची मागणी केली. माझी त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. तसेच त्यांच्याशी माझे कुठलेही वैमनस्य नाही व कुठल्याही प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे संबंध नाही. तरी त्यांचे विरूध्द मी कायदेषिर कार्यवाही करिता तक्रार देत आहे.

सोबत मी गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम पैकी माझेकडे पन्नास हजार रूपये सध्या नसल्यामूळे मी 15,000/- रुपये पुढील कार्यवाहीकरीता माझे बचतीतुन आपणाकडे हजर करीत आहे. तसेच मला प्राप्त कार्यादेष व कागदपत्रांच्या झेराक्स प्रती हजर करीत आहे.

अषी तक्रार पंचानी वाचुन टंकलिखित तक्रारीबाबत तक्रारदार यांचेषी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व त्यानंतर सदरची तक्रार आम्ही संगणकावर टंकलीखीत करून त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या.

त्यानंतर तक्रारदार आशिष प्रेमलाल डोंगरे यांना गैरअर्जदार यांना लाचे मध्ये देण्याकरिता आणलेले पैसे हजर करण्यास सांगितले असता त्यांनी लाच रक्कम 500/- रू दराच्या 30 नोटा, 15,000/- अशी आपल्या वैयक्तिक बचतीतील हजर केली तसेच त्यांनी कार्यादेश व कागदपत्रांच्या झेराक्स प्रती आमचेकडे हजर केली आम्ही व दोन्ही पंचांनी सदर कागदपत्रांची पाहणी करून तक्रारदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींवर स्वाक्षर्या केल्यात, दोन्ही पंचांनी पंच म्हणुन सदर कागदपत्रांवर स्वाक्षर्या केल्यात आम्ही समक्ष म्हणुन सदर कागदपत्रांवर सादर स्वाक्षर्या केल्या. आशिष प्रेमलाल डोंगरे यांनी हजर केलेल्या 500/- रू दराच्या 30 नोटा,15,000/- नोटांचे क्रमांक पंच क्रं. 1 यांनी वाचले पंच क्र.2 यांनी पडताळुन पाहिल्या प्रात्यक्षिक पंचनाम्याप्रमाणे

500/-रू. दराच्या 30 नोटांचे क्रंमांक खालीलप्रमाणे

अ.क्र

नोटांचे क्रमांक

अ.क्र

नोटांचे क्रमांक

अ.क्र

नोटांचे क्रमांक

9RT331685
6NS765900
8FR016830
0HR189830
2MT164363
5WE375192
9LW360872
3TE312588
6DM940539
4BU284295
8AG112129
4KD412798
0PU146592
2HN247591
6SR538469
4CU691296
5NQ749199
9RT331686
9VE890366
1GH542090
5FH269189
8HA787780
7FH555259
9RT331684
8LM958692
8PE239893
9HC596539
9QC986910
5UH972192
6MG908276

यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचेच्या सापळा प्रकरणात उपयोग करण्यात येणार्या अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहीती देवून अँथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला हिरवट रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत म.पो.हवा. अस्मिता मेश्राम यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले बाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आली आहे.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांना आमचेकडील कार्यालयात उपलब्ध असलेल्या डिजीटल व्हाॅईस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पो.अं. प्रफुल भातुलकर यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली आहे सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेली आहे.

दिनांक 21/05/2026 रोजी तक्रारदार आषिश प्रेमलाल डोंगरे यांनी वेळ 13/56 वाजता त्यांचे मोबाईल

क्रमांक 9372353541 वरुन आमचे मोबाईल फोनवर कॉल करुन कळविले की, आज रोजी गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ अजनी नागपूर हे त्यांचे कार्यालयात हजर आहे आज रोजी सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही करणे योग्य होईल अषी विनंती केली. तक्रारदार यांना तात्काळ आमचे कार्यालयात बोलावुन घेतले त्यानंतर पंच क्र. 1 व 2 यांना तक्रारदार यांनी दिलेली माहिती देवुन फोनद्वारे आमचे कार्यालयात बोलावुन घेतले तसेच स्टाफ यांना तक्रारदाराने दिलेली माहिती देवुन कार्यालयात हजर राहणेबाबत कळविले. तक्रारदार व शासकिय पंच हे अंदाजे 14/40 वा. चे सुमारास आमचे कार्यालयात हजर आले.

तक्रारदाराचे विनंती प्रमाणे आज रोजी गैरअर्जदार यांची सर्वप्रथम सापळा पडताळणी कार्यवाही करणे आवष्यक असल्याने सापळा पडताळणी कार्यवाही चुना भट्टी चैक एफ.सि.आय. गोडावुन जवळ अजनी नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

लाच मागणी पडताळणी करण्याकरीता आज दि. 21/05/2026 रोजी 15ः00 वा आम्ही, ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, 4 कोर्या मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रकमेचा लिफाफा, व स्टेषनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटॉप, लॅपटॉपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेवून आम्ही, पंच क्र. 2, पो.नि. जितेंद्र वैरागडे, पो.हवा. आषिश वैद्य, पो.अं. प्रफुल भातुलकर खाजगी वाहनाने, तक्रारदार व पंच क्र. 1 हे तक्रारदार यांचे चारचाकी वाहन क्र. एम.एच. 40 ए. आर. 9401 ने तसेच सापळा पार्टीतील सदस्य पो.अं. होमेश्वर वाईलकर, म.पो.हवा. गिता चौधरी चालक पो.अं. राजेंद्र जांभुळकर असे शासकिय वाहन क्र. एम.एच. 31 जी.जी. 1526 ने चुना भट्टी चौक, एफ.सि.आय. गोडावुन जवळ अजनी नागपूर कडे जाण्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, झिरो माईल नागपूर येथुन रवाना हावुन वेळ अंदाजे 15.25 वा. पोहोचलो. त्यानंतर गै.अ. श्री रविंद्र वानखडे, अधिक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ जलसंपदा विभाग, अजनी नागपूर यांची लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, तक्रारदार यांना त्यांच्या जवळ असलेले सर्व सामान, पैसे व कागदपत्र चारचाकी वाहनाच्या सिटवर काढुन ठेवण्यास सांगीतले व तक्रारदाराची दोन्ही पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. त्यांचेकडे कोणतीही आक्षेपार्ह वस्तु नसलयाची खात्री करण्यात आली.

त्यानंतर आम्ही चुना भट्टी चौक, एफ.सी.आय. गोडावून जवळ अजनी नागपूर येथे येवून थांबलो. वर नमुद दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सापळा पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीबाबत माहिती देवून गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. प्रत्यक्ष पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीच्या अनुशंघाने पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे सविस्तर सुचना देण्यात आल्या.

सापळा पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पो.शि भातुलकर यांनी मेमोरी कार्ड क्र. SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BM टाकुन व्हॉईस रेकॉर्डर वेळ 16/06 वा. सुरू करून पंच क्र. 1 यांच्या आवाजात तक्रारदार आषिश प्रेमलाल डोंगरे यांचेसोबत गैरअर्जदार यांचेकडे लाच रकमेच्या पडताळणी कार्यवाहीकरीता पाठविण्याकरीता पंच व तक्रारदार यांचे नाव व दिनांकासह पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाषण ध्वनीमुद्रीत करून होल्ड मोड वर करण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात कपडयाच्या आत सहज दिसुन

येणार नाही या पध्दतीने अडकवण्यात आला व तक्रारदारासह पंच क्र. 1 यांना तक्रारदाराचे खाजगी चारचाकी वाहनाने गैरअर्जदार यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. काही वेळानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हे आम्ही थांबुन असलेल्या चुना भट्टी चैक, एफ.सी.आय. गोडावून जवळ अजनी नागपूर येथे परत आले आमचे सुचनेवरुन पोअं. प्रफुल भातुलकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर वेळ 16.39 वा. बंद केले.

तक्रारदार यांची पंचासमक्ष अंगझडती घेवुन आक्षेपार्ह वस्तु नसल्याची खात्री करण्यात आली त्यानंतर पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनेक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदारासह ते गैरअर्जदार यांचे कार्यालयात गेलेले होते. गैरअर्जदाराची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांनी एक चिठ्ठी शिपायाचे हस्ते गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये पाठविली. काही वेळाने गैरअर्जदार यांचे सांगणेवरुन शिपायाने तक्रारदार यांना गैरअर्जदाराचे कॅबिनमध्ये जाण्यास सांगीतले तेव्हा मी सुध्दा त्यांचे मागोमाग कॅबिनमध्ये जात असताना तेथील हजर षिपायाने मला कॅबिनमध्ये जाण्यास मनाई केली. तक्रारदार हे गैरअर्जदाराचे कॅबिनमध्ये गेले व काही वेळानंतर परत आले त्यांनतर आम्ही परत आलो. त्यानंतर सापळा पडताळणी कार्यवाही मध्ये तक्रारदार यांना त्यांचे व गैरअर्जदार यांचे झालेल्या संभाशणाबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला तसेच मी गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये गेल्यानंतर मी सर्वप्रथम गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांचेसोबत कामाबाबत बोलणी केली त्यानंतर लाचेसंबंधी आम्ही नॉर्मली तीन टक्के घेतो तुम्ही दोन टक्के नी करुन टाका असे म्हणाले तसेच त्यांनी झालेल्या कामाबाबत एकुण रक्कमेच्या दोन टक्के म्हणजेच 50,000/- रुपये व देवु केलेल्या कामाबाबतचे दोन टक्के म्हणजेच 20,000/- रुपये असे एकुण 70,000/- रुपयाची मागणी केली मी त्यांना सद्या माझा पैशाचा लिपाफा आणला नाही तुम्ही आहात का ऑफीसला मी आणुन देतो दहा पंधरा मिनीटात असे म्हणुन पंचासह या ठिकाणी परत आलो आहे.

तक्रारदार व गैरअर्जदार यांचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डर शासकिय लॅपटॉपला जोडुन पंचासमक्ष ऐकण्यात आले व संभाशणाचे शब्दषः टिपण घेण्यात आलेले आहेत. जतन झालेली फाईल क्र. 260521-1606 ची हॅशव्हॅल्यु घेण्यात आलेली आहे. गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांनी लाचेची मागणी करुन लाच स्किारण्याची इच्छा दर्षविल्याने सापळा कार्यवाही चुनाभटटी चौक, एफ.सी.आय. गोडाउन जवळ, अजनी, नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सापळा कार्यवाही पुर्वी तक्रारदार यांची पंचासमक्ष अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम 500 रू. दराच्या 30 चलनी नोटा असे 15,000/- रुपये व इतर नकली 500 रू. दराच्या 70 नोटा असे 35,000/-रू असे एकुण 50,000/- रुपये तक्रारीप्रमाणे लाचरक्कम देण्याचे योजिले होते परंतु सापळा पडताळणी कार्यवाही दरम्यान दहा लाख रुपयाचे देवु केलेल्या कामाचे दोन टक्के म्हणजेच 20,000 रुपयाची अतिरीक्त लाचमागणी गैरअर्जदार यांनी केलेली आहे करीता लाचरक्कम 500 रू. दराच्या 30 चलनी नोटा असे 15,000/- रुपये व इतर नकली 500 रू. दराच्या 70 नोटा असे 35,000/-रू असे एकुण 50,000/- रुपयामध्ये आमचे ट्रॅपबॅगमधील 500 रुपये दराच्या नकली नोटा असे एकुण 20,000/- नकली रुपयासह एकुण 70,000/- रुपये आपले

उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांच्या पॅंटच्या उजव्या खिषात ठेवले व पंच क्र. 2 यांनी बॉटल मधील पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले.
त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोअं. प्रफुल भातुलकर यांनी SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BM मध्ये फाईल क्र. 260521-1606 व्यतीरीक्त इतर कोणतीही फाईल नसल्याची पंचांना खात्री करवुन देवुन व्हॉईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात 17.08 सुरु केला व दोरीच्या सहाय्याने व्हॉईस रेकॉर्डर कोणाला ही दिसणार नाही असे तक्रारदाराचे गळ्यात लटकवुन दिला त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना तक्रारदाराचे खाजगी चारचाकी वाहनाने रवाना करण्यात आले.

त्यांचे मागोमाग आम्ही, पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पंच क्र. 2 व पो.शी. प्रफुल भातुलकर, पो.हवा. आषिश वैद्य असे आम्ही खाजगी वाहनाने तसेच शासकिय वाहनाने चापोशि. राजेंद्र जांभुळकर, प म.पो.हवा. गीता चौधरी व पो.अं. होमेश्वर वाईलकर असे गै.अ.यांचे कार्यालय जाण्याकरीता रवाना झालो. आम्ही व आमचे खाजगी वाहनामध्ये असलेले पंच क्र. 2 व स्टाफ असे गैरअर्जदार यांचे कार्यालयाचे आवारात जावुन वाहनातच थांबुन राहीलो व तक्रारदार यांचे Done या व्हॉट्सअँप मॅसेजची वाट पाहत थांबुन राहीलो. वेळ 17.40 वा. गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांनी लाच स्विकारल्याबाबत Done असा व्हॉट्सअँप मॅसेज मिळताच आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह तात्काळ गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये प्रवेश करुन इतर सापळा पार्टीला फोनद्वारे गैरअर्जदार यांचे कॅबिनकडे ट्रॅप बॅग व इतर साहित्यासह बोलावुन घेतले. त्यानंतर गैरअर्जदार यांचे कॅबिनमधील लाईट बंद करुन अंधार करुन घेतला त्यानंतर गैरअर्जदार यांचा उजवा हात ते बसुन असलेला टेबलच्या डाव्या बाजुचा कप्प्याची अल्ट्राव्हायलेटच्या दिव्याने पाहणी केली असता हिरवट चकाकी दिसुन आली. तक्रारदार यांचे उजव्या हाताची व परिधान केलेल्या पॅंटच्या उजव्या खिशाची अल्ट्राव्हायलेटच्या दिव्याने पाहणी केली असता हिरवट चकाकी दिसुन आली. व्हॉईसरेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात आमचे सुचनेवरुन पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी वेळ 17/45 वा. बंद केला. त्यानंतर गैरअर्जदार श्री रविंद्र वानखडे यांची अंगझडती घेण्यात आली.
यानंतर आरोपी श्री.रविंद्र वानखडे यांची पंच क्र. 1 यांची मार्फतीने सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती घेण्यात आली. आरोपीची सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती हस्तलिखीत यादीमध्ये मिळुन आलेल्या चिज वस्तु व रोख बाबत अंगझडतीत नमुद करण्यात आले अंगझडती मध्ये मिळून आलेले चिज वस्तु गै.अ. श्री. रविंद्र वानखडे यांना परत करण्यात आल्या. हस्तलिखीत अंगझडतीवर पंच व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली तसेच चिज वस्तु परत मिळाल्याबाबत गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांची स्वाक्षरी केलेली आहे. गैरअर्जदार यांचा मोबाईल तपासनी कामी ताब्यात घेण्यात आला तसेच लाच रक्कमेसह मिळुन आलेली इतर रोख रक्कम एकुण 36,630/- रुपये ताब्यात घेवुन स्वतंत्र वेगवेगळ्या जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आलेल्या आहेत. लाचरक्कम, इतर रोख रक्कम व मोबाईल स्वतंत्र कागदी लिपाफ्यामध्ये ठेवुन गैरअर्जदार, पंच व आमचे स्वाक्षरीचे कागदी लेबल तयार करुन सिलबंद करण्यात आले.
त्यानंतर तक्रारदाराची सापळया नंतरची अंगझडती दोन्ही पंचासमक्ष घेतली असता त्यांचे जवळ सापळयापुर्वीच्या अंगझडती यादी दरम्यान मिळून आलेल्या सर्व चिजवस्तू बरोबर असल्याचे आढळून आल्या. तक्रारदार यांची हस्तलिखीत सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती यादी तयार करून,

अंगझडतीत मिळून आलेले चिज वस्तु व रोख बाबत अंगझडतीत नमुद करण्यात आले. अंगझडती यादीवर तक्रारदार व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली. अंगझडती मध्ये मिळून आलेले चिज वस्तू तक्रारदार श्री. आशिष डोंगरे यांना वेळीच परत करण्यात आली.घटणास्थळाचे ठिकाणांचे मोजमाप टेपच्या सहयाने घेवुन त्याची नोंद घेण्यात आली. त्याच प्रमाणे घटनास्थळाचा कच्चा नकाशा म.पो.हवा. गीता चौधरी यांचे हस्ते तयार करण्यात आला.

त्यानंतर पंच क्र 2 यांना गैरअर्जदार रविंद्र वानखडे यांनी तक्रारदार यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कम 15,000 रू ज्यात 500 रू दराचे चलनी 30 नोटा गैरअर्जदार यांचे कार्यालयातच नोटाचे क्रमांक आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 श्री. अमित बागेश्वर यांनी वाचले व पंच क्र. 2 पियुश मेश्राम यांनी प्रात्यक्षीक पंचनामा मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले प्रात्यक्षिक पंचनामाप्रमाणे तंतोतंत असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्री. अमित बागेष्वर यांना तक्रारदार श्री. आशिष डोंगरे व गै.अ.श्री. रविंद्र वानखडे यांच्यात लाच पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या चारचाकी वाहनाने गै.अ.श्री. रविंद्र वानखडे यांचे कार्यालयामध्ये नमुद गैरअर्जदार यांचे लाच सापळा कार्यवाही करीता गेलो तेथे पोहाचेल्यावर मी व तक्रारदार गै.अ. श्री. रविंद्र वानखडे यांचे कॅबिनजवळ जावुन एका षिपायाचे हाताने गै.अ.श्री. रविंद्र वानखडे यांना भेटण्याकरीता तक्रारदार यांनी चिठ्ठी दिली व तक्रारदारासह मी तेथील प्रतिक्षालयात थांबुन राहीलो. काही वेळानंतर गैरअर्जदार यांनी बेल वाजविल्यावर तेथील षिपायाने तक्रारदारास कॅबिनमध्ये जावु शकता असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार व मी असे दोघेही गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये जाण्यास निघालो तेव्हा तेथील षिपायाने मला कॅबिनमध्ये जाण्यास थांबविले. म्हणुन मी तेथेच कॅबिन बाहेर थांबुन राहीलो आपण दिलेल्या सुचनेप्रमाणे गैरअर्जदार यांनी लाचरक्कम स्किारल्याबाबत तक्रारदार यांनी आपणास क्वदम असा व्हाॅट्सअँप मॅसेज दिला असावा त्यानंतर पुढील कार्यवाहीकरीता आपण पंच क्र 2 व स्टाफसह गैरअर्जदार यांचे कॅबिन मध्ये आले व काही वेळाने माझे आवाजात व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केला आहे असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला तसेच मी गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये गेल्यानंतर मी सर्वप्रथम गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांचेसोबत कामाबाबत बोलणी केली त्यानंतर गैरअर्जदार यांनी किती आणले असे विचारले? त्यावर मी 50,000 व 20,000 असे एकुण 70,000 रुपये आणले असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांचे लाचमागणीवरुन मी माझे पॅन्टचे उजवे खिशातुन उजव्या हाताने लाचरक्कम काढुन गैरअर्जदार यांना दिले त्यांनी आपल्या उजव्या हाताने लाचरक्कम स्विकारुन ते बसुन असलेल्या टेबलच्या डाव्या कप्प्यामध्ये ठेवली त्यानंतर मी आपण दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे व्हाॅट्सॅप वरुन आपले व्हाॅट्सॅप वर Done असा मॅसेज दिल्यावरुन आपण गैरअर्जदाराचे कॅबीनमध्ये येवुन पुढील कार्यवाही केलेली आहे.

त्यांनतर व्हाॅईस रेकाॅर्डर व्दारे तक्रारदार व गैरअर्जदार श्री. रविंद्र वानखडे यांचे सापळा कार्यवाही दरम्यान झालेले संभाषण शांत वातावरणात ऐकुन त्याचे शब्दषः टिपण करणे असल्याने, तसेच गैरअर्जदार यांचे कार्यालयात गर्दी व गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने पुढील कार्यवाही

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. तसेच लाच रक्कम आरोपी श्री रविंद्र वानखडे यांनी स्विकारली असल्याने, आरोपीस आम्ही शासकिय वाहनात बसवुन, सापळा पार्टीतील सदस्य व पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे पुढील कार्यवाहीकरीता घेवुन आलो.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे पोहचल्या नंतर आरोपीचे निवेदन घेण्यात आले. त्यानंतर तक्रारदार श्री. आशिष डोंगरे व गै.अ. श्री. रविंद्र वानखडे यांचे मध्ये झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BM मधील 260521-1708 या क्रमांकाच्या फाईलमध्ये ध्वनीमुद्रीत झाले असल्याने सदर संभाषणातील सापळा कार्यवाही संबंधाने घटनेशी लागू व ऐकीव संभाषणाचे शब्दषः टिपण (स्क्रिप्ट) तयार करण्यात आली.

त्यानंतर सदर व्हाईस रेकॉर्डर मधील SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BM मधील 260521-1708 या फाईल चे SEVENZA HASH CALCULATOR या अप्लीकेषन सॉफ्टवेअरच्या MD 5Algorithm साह्याने हॅश व्हॅल्यु पडताळणी नंतर काढली असता हॅश व्हॅल्यु 5C93FAB0D8D29E7726356A09448091DFअशी निर्माण झाली आहे. फाईल क्र. 2 260521_1606 , 260521_1708 चे हॅशव्हॅल्यु प्रमाणपत्रांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही तसेच पो.अं. प्रफुल भातुलकर व पंचांनी स्वाक्षरी केलेल्या आहेत.

त्यानंतर लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही नंतर मेमोरी कार्ड SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 52010NAZN130 BM प्लास्टीकच्या केस मध्ये सुरक्षीत ठेवुन त्या पाकीटावर प्रदर्ष च् असे प्रदर्श लिहुन एका कागदी पाकीटात ठेवून मेमोरी कार्डचे जप्तीपत्रक व सिल लेबल शासकिय लॅपटॉपवर टंकलिखीत करून तयार करण्यात आले होते. सदर मेमोरी कार्डचे जप्तीपत्रक व मेमरीकार्डचे टंकलिखीत केलेल्या विवरणचे लेबलची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढुन, त्यावर आम्ही व दोन्ही पंचाच्या सही करून ते लेबल सदर पाकीटावर चिपकवुन सदर पाकीटाला डिकांने बंद करून लाखेचे सिल लावून लिफाफा सिलबंद केला.

तरी यातील गैरअर्जदार श्री. रविंद्र निळकंठ वानखडे वय 56 वर्ष पद- अधिक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ, जलसंपदा विभाग नागपूर रा.सावरखेड ता. मोर्षी जि. अमरावती ह.मु. प्लॉट नं. 19 जनता सोसायटी दिनदयाल नगर नागपूर याने तक्रारदार यास प्रलंबित देयके मंजुर करुन देण्याच्या मोबदल्यात दि.21/05/2026 रोजी स्वतःचे लाभाकरीता लाचमागणी करुन स्वतः लाच स्विकारल्याने त्यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, सुधारणा 2018 कलम 7 अन्वये कायदेषीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेषीर फिर्याद आहे.

( अनिल जिट्टावार )

पोलीस उपअधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SAINATH DATTATRAY RAMOD (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SAINATH DATTATRAY RAMOD

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** POBN83198

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1970 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)